जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट दिनांक २९.०५.२०२५

कोपरी, ठाणे परिसरात कोयता घेवुन ज्येष्ठ नागरिक, तसेच परिसरातील व्यापाऱ्यांना धमकावणाऱ्या, खंडणी वसुल करणारा, जबरीने चोरी करणारा, गाडयांची तोडफोड करुन दहशकत माजवीणाऱ्या, गुन्हेगारास खंडणी विरोधी पथकां कडून नाशिक येथे अटक

कोपरी ठाणे पूर्व परिसारात वयोवृध्द जेष्ठ नागरीक फिर्यादी हे त्यांचे पत्नी मुलासह रहात असुन ते दुचाकी, चारचाकी गाडयाचे सर्व्हीस सेंटर चालवीतात. दि.२३/०५/२०२५ रोजी फिर्यादी हे त्यांचे कामानिमीत्त रस्त्यावरुन जात असताना रेकॉर्डवरील हिस्ट्रिशिटर गुन्हेगार नामे सनी उमेश तेलुरे याने फिर्यादी यांना रस्त्यावर आडवुन, कोयत्याचा धाक दाखवुन, सर्व्हीस सेंटर चालवायचे असेल तर महिना ३०००/-रु. हप्ता दयावा लागेल असे धमकावीले. त्यावेळी फिर्यादी यांनी सनी तेलुरे यास हप्ता देण्यास नकार दिला असता सनी तेलुरे याने फिर्यादी यांना शिविगाळ करुन, जिवे ठार मारण्याची धमकी देवुन, ठोश्याबुक्क्याने मारहाण करून, त्यांचे खिशातुन रोख २१००/-रु. रक्कम जबरीने काढुन घेवुन, कोयत्याने रस्त्यावर उभ्या असलेल्या गाडयांची, सामानाची तोडफोड करुन व्यापाऱ्यांना व लोकांना धमकावुन दहशत निर्माण केली आहे. सदर घटनेबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **कोपरी पोलीस स्टेशन** येथे गुन्हा रजि.नं.कलम **४०१/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०९(६), ३२४(४), ३२४(५), ३५१(२), ३५१(३) प्रमाणे** गुन्हा दाखल आहे. सदरचा गुन्हा केल्यानंतर आरोपी सनि तेलुरे हा पळुन गेला होता व तो पोलीसांना मिळुन येत नव्हता. मा.वरिष्ठांचे आदेशाने सहायक पोलीस निरीक्षक कापडणीस आणि पथकाने सदर गुन्ह्याचा समांतर तपास करून, पाहिजे आरोपी सनी तेलुरे याचे मोबाईल फोन क्रमांकाचे तांत्रीक विश्लेषण करुन, तसेच गुप्त बातमीदारा मार्फत माहीती मिळवुन, शोध घेवुन नमुद आरोपी **सनी उमेश तेलुरे, वय २३वर्षे,रा.बिल्डींग नं.२चे पाठीमागे, पी.डब्लू.डी चाळ, सिध्दार्थ नगर, कोपरी कॉलनी, फटाका मार्केट, ठाणे पु.** यास दि. २८/०५/२०२५ रोजी नाशिक येथुन शिताफीने अटक केली आहे.

सदर आरोपी सनी तेलुरे हा वर नमुद गुन्हयाव्यतीरीक्त **कोपरी पो.स्टे.गु.र.न. ३४०/२०२५ भा.न्या.सं. ३०८(४), १२६(२), ३५२, ३५१(३), ३(५)** या गुन्हयात देखील पाहीजे आरोपी असल्याने सदर आरोपीस अटक करुन खंडणी विरोधी पथकाने दोन गुन्हे उघडकीस आणले आहेत. सदर आरोपीस न्यायालयात हजर केले असता त्याची दिनांक ०२/०६/२०२५ रोजी पावेतो पोलीस कोठडी रिमांड मंजूर केलेली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि/सुभाष तावडे खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे शहर हे करीत आहे.

अटक आरोपी सनी उमेश तेलुरे हा रेकॉर्डवरील हिस्ट्रीशीटर गुन्हेगार असुन त्याचेविरुध्द यापुर्वी खालीलप्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

अ. क्र.	पोलीस स्टेशन	गु.र.नं. व कलम	सदयस्थिती
१	कोपरी	६०/२०१७ भादवि ४५४,४५७, ३८०, ३४ प्रमाणे	न्यायप्रविष्ठ
२	कोपरी	६३/२०१७ भादवि ४५४,४५७, ३८०, ३४ प्रमाणे	न्यायप्रविष्ठ
३	कोपरी	५४/२०१८ भादवि ३८०, ३४ प्रमाणे	न्यायप्रविष्ठ
४	कोपरी	१९/२०१८ भादवि ३८०, ३४ प्रमाणे	न्यायप्रविष्ठ
५	कोपरी	अदखलपात्र गुन्हा रजि नं. ८४०/२०१८ भादवि कलम ३२३, ५०४, ५०६ ४२७ प्रमाणे	न्यायप्रविष्ठ

PDF Scanner ACE Scanner

६	कोपरी	८०/२०१८ भादवि ३२४, ३४ प्रमाणे	न्यायप्रविष्ठ
७	कोपरी	०८/२०१९ भादवि ३०७, ३५२, ३२३, ५०४, ३४ प्रमाणे	न्यायप्रविष्ठ
८	कोपरी	॥ २६/२०१९ मपोका कलम ३७(१)१३५ प्रमाणे	न्यायप्रविष्ठ
९	कोपरी	८८/२०१९ भादवि ३०७, ३२४, ५०४, ३४ प्रमाणे	न्यायप्रविष्ठ
१०	कोपरी	अदखलपात्र गुन्हा रजि नं. ५६७/२०२० भादवि कलम ५०४ प्रमाणे	न्यायप्रविष्ठ
११	कोपरी	४८/२०२१ भादवि कलम ३२४, ३२३, ५०६, ३६४(अ), ३६५, ३८५, १४४, १४८, १४९, सह आर्म ॲक्ट कलम ४, २५ सह मपोका कलम ३७(१)१३५ प्रमाणे	न्यायप्रविष्ठ
१२	कळवा	५१/२०२१ भादवि ३२६, ३२३,५०४, ३४ सह आर्म ॲक्ट कलम ४, २५ सह मपोका कलम ३७(१)१३५ प्रमाणे	न्यायप्रविष्ठ
१३	कळवा	५२/२०२१ भादवि ३५३, ५०४, ३४ प्रमाणे	न्यायप्रविष्ठ
१४	कोपरी	४०१/२०२४ भारतीय न्याय सहिता २०२३ चे कलम ३०९(६), ३२४(४), ३२४(५), ३५१(२), ३५१(३) प्रमाणे	पोलीस तपासावर
१५	कोपरी	२६१/२०२५ भादवि कलम १३२, ३५२ प्रमाणे	न्यायप्रविष्ठ
१६	कोपरी	३४०/२०२५ भा.न्या.सं. ३०८(४), १२६(२), ३५२, ३५१(३), ३(५) प्रमाणे	पोलीस तपासावर

सदरची कारवाई श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, (गुन्हे), श्री.शेखर बागडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, शोध १, तथा प्रभारी अधिकारी खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली पोनि/श्री.नरेंद्र पवार, सपोनिरी/भुषण कापडणीस, सुनिल तारमळे, पोउपनिरी/विजयकुमार राठोड, सुभाष तावडे, सपोउनि/संदिप भोसले, पोहवा/दिपक गडगे, संजय राठोड, राजाराम पाटील, योगीराज कानडे, अभिजीत गायकवाड, शैलेश शिंदे, मपोहवा/शितल पावसकर, पोना/रविंद्र हासे, पोशि/अरविंद शेजवळ, तानाजी पाटील, विनोद ढाकणे, संतोष वायकर, मपोशि/मयुरी भोसले, चापोना/भगवान हिवरे यांनी केलेली आहे.

PDF Scanner ACE Scanner